दैनिक
बीड महाराष्ट्र | शनिवार, 29 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 111 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# LCB परभणीचा दणका ! 23 लाखांची चोरीची केबल जप्त

## जालन्यातील चोरीचा 100 टक्के मुद्देमाल परभणी LCB ने काही तासांत केला हस्तगत

### पोखरणीतून दोघे ताब्यात

■ परभणी | प्रतिनिधी

परभणी स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी राबवलेल्या विशेष मोहिमेत मोठी कारवाई केली आहे. जालना जिल्ह्यातील चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेलेली तब्बल २३ लाख रुपये किमतीची केबल वायर परभणी LCB ने जप्त केली असून, या प्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत (IPS) यांच्या आदेशानुसार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या नेतृत्वाखाली LCBचे पथक २८ ऑगस्ट रोजी परिसरात गस्त घालत होते. याचदरम्यान पोखरणी परिसरात काही जण चोरीची केबल घेऊन जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

माहितीची खातरजमा करून LCBच्या पथकाने पोखरणी परिसरात तात्काळ सापळा रचला. यावेळी बाबू अण्णासाहेब शिंदे आणि दिलीप अण्णासाहेब शिंदे, दोघेही रा. पोखरणी, जि. परभणी, यांना ताब्यात घेण्यात आले. संशयितांची चौकशी केली असता, त्यांच्याकडील केबल ही चंदनझिरा पोलीस ठाणे, जि. जालना येथील गु.रं. ५२६/२०२६, कलम ३०३(२) BNS अंतर्गत



दाखल चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे समोर आले. पोलिसांनी तब्बल २३ लाख रुपये किमतीचा १०० टक्के चोरीचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींना मुद्देमालासह दैठणा पोलीस ठाणे येथे गु.रं. ३६६/२०२६, कलम १२४ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये दाखल करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी वर्ग करण्यात आले आहे.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, पोलीस अंमलदार रामकीशन काळे, गोविंद वड, देविदास बुकरे, संदीप चौरे आणि महारुद्र सपकाळ यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.




# गोढाळ्यात शेतकऱ्यांच्या वीज समस्यांवर संतोष नागरगोजेंचा थेट हस्तक्षेप

## १० दिवसांत प्रश्न सोडवण्याचे महावितरणचे आश्वासन

■ रेनापुर / प्रतिनिधी

गोढाळा येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस संतोषभाऊ नागरगोजे यांनी भेट देऊन गावातील शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या विविध समस्या जाणून घेतल्या.

यावेळी शेतीच्या वीजपुरवठ्याशी संबंधित समस्यांबाबत रेणापूर येथील महावितरणचे उपकार्यकारी अभियंता काळे साहेब तसेच अभियंता महाजन साहेब यांच्या समक्ष शेतकऱ्यांशी चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांना शेतीसाठी वीजपुरवठा करताना येणाऱ्या अडचणी यावेळी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या.

शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर उपकार्यकारी अभियंता काळे यांनी गोढाळा गावातील शेतकऱ्यांच्या वीजसंदर्भातील समस्या येत्या दहा दिवसांत सोडविण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले. यानंतर संतोषभाऊ नागरगोजे यांनी पालकांसह गोढाळा येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांच्या अडचणी आणि शाळेतील विविध सुविधांबाबत मुख्याध्यापक व शिक्षकांशी चर्चा करण्यात आली. तसेच पालकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या आणि अपेक्षाही जाणून घेण्यात आल्या.

त्यानंतर गावातील अंगणवाडीलाही भेट देऊन तेथील समस्या आणि आवश्यक सुविधांची माहिती घेण्यात आली. संबंधित अडचणी सोडवण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन संतोषभाऊ नागरगोजे यांनी यावेळी दिले. या भेटीदरम्यान गोढाळा गावचे उपसरपंच जगदीश भताने, माणिक अण्णा डोंगरे, मनसे कार्यकर्ते सुनील लटपटे, गणेश अबरबंडे, गोविंद भताने, माधव भताने यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या वीज समस्यांसोबतच शिक्षण आणि अंगणवाडीच्या प्रश्नांवरही थेट गावात जाऊन चर्चा केल्याने संतोषभाऊ नागरगोजे यांच्या गोढाळा भेटीकडे ग्रामस्थांचे लक्ष वेधले आहे.





# सुनीता नागरगोजे यांची बीड जिल्हा महिला अध्यक्ष तर ज्ञानेश्वर नागरगोजे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

■ बीड प्रतिनिधी

बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने बीड जिल्ह्यातील संघटन मजबूत करण्यासाठी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये श्रवण ऑर्केस्ट्रा ग्रुपच्या प्रसिद्ध निवेदिका सुनीता नागरगोजे यांची बीड जिल्हा महिला अध्यक्षपदी तर गायक ज्ञानेश्वर नागरगोजे यांची बीड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी व सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन ही जबाबदारी त्यांना सोपवण्यात आली आहे. सुनीता नागरगोजे यांच्या निवेदनाचा प्रदीर्घ अनुभव आणि ज्ञानेश्वर नागरगोजे यांचे गायन व संघटन कौशल्य यांमुळे बीड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील कलाकारांना, विशेषतः महिला कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

या महत्त्वपूर्ण निवडीबद्दल बहुजन विकास सांस्कृतिक कला मंचाचे संस्थापक अध्यक्ष (प्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार) सन्माननीय दत्ता शिंदे, उपाध्यक्ष तात्याराव झेंडे आणि कार्याध्यक्ष बाबासाहेब केदार सर यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत.

या दुहेरी निवडीमुळे श्रवण ऑर्केस्ट्रा ग्रुपसह बीड जिल्ह्यातील कला व सांस्कृतिक वर्तुळात उत्साहाचे वातावरण असून, आज बनकरंजा येथे सर्व ग्रामस्थांच्या वतीने ज्ञानेश्वर नागरगोजे व सुनिता नागरगोजे यांचा भव्य सत्कार करण्यात आला यावेळी या कार्यक्रमाला बहुजन विकास संस्कृतीक कला मंच महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष विजयकुमार मस्के व बहुजन विकास संस्कृतीक कला मंच महाराष्ट्र राज्य संघटक श्री महादेव ठोंबरे साहेब यांनी सुनिता नागरगोजे व ज्ञानेश्वर यांचे कौतुक करून त्याचबरोबर गावातील सर्व नागरिकांनीही त्यांचा भव्य सत्कार केल्याबद्दल ग्रामस्थांचे आभार मानले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या तसेच ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी ग्रामस्थांचे आभार मानून तुम्ही दिलेल्या शुभेच्छा आणि शाबासकीची थाप या केलेल्या कौतुकात मी सदैव ऋणी राहील व माझे कार्य चांगल्या प्रकारे करत राहील असे म्हणून सर्वांचे आभार मानले यावेळी गावातील व परिसरस्तरातून सुनीता नागरगोजे आणि ज्ञानेश्वर नागरगोजे यांच्यावर अभिनंदनाचा व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

यावेळी गावातील श्री विष्णू शंकर नागरगोजे, विक्रम भानुदास लांब, बापूराव थोरात, युवराज थोरात, बालाजी नागरगोजे, शेप प्रमोद,अशोक नागरगोजे, शिवराम नागरगोजे, माऊली लांब, नरसिंह लांब, रामचंद्र नेमटे, विकास लांब, बंकट नागरगोजे, देविदास लांब, गोरख नागरगोजे, सोमनाथ लांब, जोतिराम पवार, नवनाथ गिरी, राजेभाऊ लांब, विजय लांब, शिवकन्या नागरगोजे, दादासाहेब थोरात, वैभव लांब, परमेश्वर लांब, गोविंद लांब, कृष्णा पारवे, दुर्गादास लांब, यांच्या सह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संपादकीय

## कोकणचं कॅलिफोर्निया अन् बारामती...!

कोकणच्या कॅलिफोर्नियाच्या 'गजाली' ऐकूणच कोकणातील आजची साठी-सत्तरीतली पिढी लहानाची मोठी झाली. त्यावेळच्या जाहीर सभा, समारंभामध्ये विशेषकरून निवडणूक काळात तर, कोकणचं कॅलिफोर्निया केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, अशा प्रकारची भाषणं ऐकायला मिळायची. त्याकाळच्या विद्यार्थी दशेतील सर्वांनाच 'कॅलिफोर्निया' म्हणजे काय आहे? कोकणचं कॅलिफोर्निया होणार म्हणजे काय होणार? हा प्रश्न सतत मनात यायचा. कोकणचं निसर्ग सौंदर्य कॅलिफोर्नियापेक्षाही सुंदर आहे. इथली नैसर्गिकता ही सर्वात अग्रस्थानी आहे. हे नंतरच्या काळात चर्चेतून ऐकायला मिळाले. १९९० पर्यंतच्या जवळपास कोकणातील होणाऱ्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत कॅलिफोर्निया आणि कोकण याची भाषणातून तुलना व्हायची. त्यासंबंधी किमान कोकण हे कॅलिफोर्नियापेक्षाही अधिक उजवं आहे. हे नंतरच्या काळात कोकणाला कळून चुकले.

कोणत्याही भागाचा विकास हा सकारात्मक मानसिकतेवर अवलंबून रहातो. महाराष्ट्राची राजधानी मुंबईला लागून असलेला ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे मिळून कोकण होतं. या कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गाची भौगोलिकता एकसमान आहे. रायगड ते सिंधुदुर्गला निसर्ग, समुद्र हे सारेच सोबत आहेत. एवढं सृष्टीसौंदर्य आपणाकडे असतानाही ज्या पद्धतीने प्रगतीची गती अधिकतर असायला हवी होती, तशी ती आपणाला राखता आली नाही. कोकणचा कॅलिफोर्निया होणार या गावगप्पांमध्येच अनेक वर्षे आपण वाया घालवली. १९९० नंतर खऱ्या अर्थाने कोकणच्या विकासासंबंधी काही चर्चा होऊ लागली. तत्पूर्वीपर्यंत, कोकणाला काय हवे - मासे, भात आहे. दोन वेळची भ्रांत कोकणवासियांना नाही. या अशा विचारातच आपण गढून गेलो होतो. शेती, बागायती पलीकडे विकासाच्या वाटा आहेत. या वाटेवरून चालण्याचा प्रयत्न पूर्वी कोणी केला नाही. शिक्षणाच्या सोईच उपलब्ध नसल्याने तरूणांना शिक्षणाच्या नवीन वाटा खुणावण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे दहावी, बारावी पास झाल्यावर मुंबईला जाऊन मिळेल ते काम करणे या अशा चौकटीतल्या वातावरणात कोकणचा तरूण खरंतर नवीन काही करण्याच्या मानसिकतेतच राहिला नाही. कॅलिफोर्नियाच्या स्वप्नरंजनातून कधीचाच कोकण बाहेर आला. परंतु विकासाच्या नव्या वाटेवर चालण्याची त्याची मानसिकता मात्र खुज्या मनाच्या राजकीय पुढाऱ्यांनी वाढूच दिली नाही. त्यामुळे कोकणातील काहींच्या मते कोकणात नवीन काही उद्योग नको, विकासाचे कोणतेही प्रकल्प नको. आम्हाला काही नको. पण आम्हाला विकास हवा. काही नको असं एकीकडे म्हणायचं, तसा आग्रह धरत काहींचा बुद्धीभेद करायचा आणि दुसरीकडे रोजगाराच्या कोणत्याही संधी कोकणात नाहीत म्हणून गळा काढायचा, अशा दुटप्पी आणि कोणतंही 'व्हीजन' नसलेल्या विचारधारेने कोकणाचं फार मोठं नुकसानच झालं आहे.

एकीकडे या अशा मानसिकतेचीच लोकं पुन्हा बारामतीचा किती विकास झाला. मग कोकणात एवढे मोठे नेते असून काय केलं? म्हणून प्रश्न उपस्थित करणार. बारामतीचा विकास निश्चितच नजरेत भरणारा झाला आहे. परंतु त्यामागच्या कारणांची चर्चा करण्याचीही आपली तयारी असायला हवी. ज्येष्ठ नेते खा. शरद पवार अनेक वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले. केंद्रिय मंत्री राहिले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार दीर्घकाळ महाराष्ट्राच्या सत्तेचे वाटेकरी राहिले. अर्थमंत्रालय अनेकवर्षे त्यांनी सांभाळले. साहजिकच सत्तेतील विकासनिधीच्या माध्यमातून सारा वाटा बारामतीकडे वळवला गेला. अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संस्थांची निर्मिती झाली. जे प्रकल्प उभे राहिले त्यामागे निश्चितपणे नेते शरद पवार आणि पवार कुटुंबियांचे मोठं योगदान राहिले आहे. परंतु त्याचबरोबर बारामतीच्या गतिमान विकास प्रक्रियेला बारामतीच्या जनतेने विरोधाची भूमिका न घेता सतत त्याची पाठराखण करत राहिले. विरोधासाठी विरोध करणारी आणि जनतेचा बुद्धीभेद करणारी टाळकी बारामतीत नाहीत. उलट विकासाला मूक सहमती देणारे राजकीय पुढारी एकीकडे बारामतीत असाताना निवडणुका जाहीर झाल्यावर पक्षीय, वैचारिक विरोध म्हणून शरद पवार, अजित पवार यांच्याविरोधात निवडणुकीला कडाडून विरोध करणारेही गेली अनेकवर्षे बारामतीत आहेत. राजकीय विरोध करणं वेगळं आणि विकासाच्या आडवं जात सातत्याने विकासप्रक्रियेला विरोध करणं वेगळी गोष्ट आहे.

या गफलती बारामतीत कधी कोणी केल्या नाहीत. त्यामुळेच बारामतीचा विकास होऊ शकला ही वस्तुस्थिती आहे. याउलट आपल्या कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गात कोणताही नवीन विकासाचा प्रकल्प आला, त्याची साधी चर्चा जरी झाली तरीही त्याला विरोध हा ठरलेलाच असतो. काही संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते केवळ विरोधी वातावरण तयार करतात. जेणेकरून चांगल काहीही उभं राहू नये, विकासाचा प्रकल्प कोकणात येऊच नये यासाठी प्रयत्न करणारे काही तथाकथित सामाजिक, राजकीय कार्यकर्ते कार्यरत आहेच. गंमत म्हणजे हेच विरोध करणारे बारामतीत शरद पवार, दिवंगत अजित पवार यांनी कसा विकास केला यावर गजाली करताना दिसतात. १९९० साली कोकणच्या राजकारणात खा. नारायण राणे यांची एंण्ट्री झाल्यानंतर अनेक प्रकल्प आणण्याचे प्रयत्न केले. परंतु प्रत्येक नवीन येणाऱ्या प्रकल्पांना विरोध करण्याचाच प्रयत्न काहींनी केला. कोकणातील कोणताही विकास प्रकल्प ठराविक कालमर्यादेत उभा राहू शकला नाही. सिंधुदुर्गातील चिपी विमानतळ आज ज्या स्वरूपात आहे, खरंतर चिपी येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याचा मूळ आराखडा होता. परंतु चिपी विमानतळ प्रकल्पाला काळे झेंडे दाखवत विरोध झाला, तेव्हा मोपाला आंतरराष्ट्रीय विमानतळाचा प्रस्तावही नव्हता. तेव्हा चिपीला विमानतळाचा प्रस्ताव पुढे आलेला. परंतु राजकारणासाठी विकासाला विरोध करण्याच्या मानसिकतेने चिपीला आंतरराष्ट्रीय विमानतळही नाही. आंतरदेशीय विमानतळ उभारणीलाही विलंबच झाला. याच वास्तविकतेचा कधीतरी विचार करण्यात आला पाहिजे. बारामतीतील झालेला विकास याच सारं श्रेय जसे शरद पवार, अजित पवार यांना आहे तसंच ते तिथल्या जनतेने पवार यांना जी साथ, पाठींबा आणि सहकार्य केलं त्यालाही जातं हे निश्चितपणे कुणालाही नाकारता येणारे नाही. त्यामुळे कोकणची नेहमी बारामतीशी तुलना केली जात असताना कोकणच्या राजकीय नेते, पुढाऱ्यांनी, जनतेने सकारात्मक विचार करण्याची आवश्यकता आहे.




## लोकरंग

### साप्ताहिक संवाद व्यावहारिक मराठी सक्तीचेच

महाराष्ट्रात अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकाना प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी व्यावहारिक मराठी भाषेचे द्यान असणे आवश्यक आहे.याच उद्देशातून राज्याच्या परिवहन विभागाने अमराठी रिक्षा टॅक्सी चालकाना मराठी.शिकविण्यासाठी प्रशिक्षण वर्ग देखील.सुरू केले.मात्र, मराठी भाषेचे न्यान अनिवार्य करणाऱ्या या उपक्रमाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली आहे.याच अनुषंगाने राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी साप्ताहिक संवाद.

### रिक्षा टॅक्सी चालकाना मराठी भाषेचे प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आले त्याबद्दल काय सांगाल?

आपण ज्या राज्यात आपल्या उपजिविकेसाठी रोजगारासाठी राबतो त्या राज्याची अगदी प्राथमिक मातृभाषा प्रत्येक अमराठी माणसाला अवगत असावी असा साधा सोपा नियम प्रत्येक राज्याला लागू होतो.त्यामुळे महाराष्ट्रात रिक्षा टॅक्सी चालविणाऱ्या वाहन चालकाना व्यवहारिक कामाच्या अनुषंगाने किमान मराठी.भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.त्यासाठीच सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून 105 दिवसांचा मराठी.भाषा प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात आला.ज्या माध्यमातून 1 लाख 65 हजार 800 चालकाना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यात आले.हा उपक्रम पुढील काळात देखील सुरू ठेवला जाणार आहे.

### या उपक्रमाला वाहन चालकांचा प्रतिसाद सकारात्मक होता का?

नक्कीच.मराठी भाषा प्रशिक्षण उपक्रमाला अमराठी चालकांचा उत्तम सकारात्मक प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राची अस्मिता आणि संस्कृतीचा आदर राखण्याची भूमिका या वाहन चालकांनी घेतली.अर्थात राज्य शासनाच्या या मराठी.भाषा प्रशिक्षण कार्यक्रमात मोठ्या संख्येने वाहन चालक उत्तीर्ण झाले. ज्यांना अजून देखील मराठी भाषेचे प्रशिक्षण.घ्यायचे आहे त्यांच्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघाच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यशाळा यापुढेही सुरू ठेवण्यात येणार आहेत.

### मराठी भाषा प्रशिक्षणासाठी अतिरिक्त मुदत दिली जाणार आहे त्याबद्दल?

**▪ रिक्षा टॅक्सी चालकाना जे मराठी.भाषेच्या परीक्षेत अयशस्वी ठरलेले आहेत त्यांना राज्याच्या.परिवहन विभागाने अतिरिक्त मुदत दिलेली आहे.संबंधित चालकाना एक महिन्याची प्राथमिक मुदत देण्यात येईल.त्यानंतर आवश्यक. असल्यास तीन.महिन्याची मुदतवाढ दिली जाईल.या कालावधीत चालकाना मराठी भाषा शिकण्याची संधी दिली जाईल.या प्रक्रियेत संबंधित नियमानुसार चालकाचा परवाना रद्द करण्याची कारवाई होऊ शकते.मात्र जे चालक प्राथमिक मराठी भाषा शिकलेले आहेत त्यांच्यावर कारवाई होणार नाही.**

### चलती का नाम गाडी

**▪ होंडामोटरसायकलआणिहोंडापॉवरपॅकएनर्जीइंडियाची भागीदारी**



## रक्षाबंधन : राखीच्या धाग्यापेक्षा संपत्तीचा हिशेब मोठा ठरतोय का? : डॉ . सुवर्णा कराड

रक्षाबंधनाचा सण आला की भाऊ-बहिणीच्या नात्याची आठवण होते. बहिण भावाच्या मनगटावर राखी बांधते, भाऊ तिचे रक्षण करण्याचे वचन देतो आणि दोघांच्या नात्यातील प्रेम पुन्हा एकदा व्यक्त होते. डिजिटल युगात या भावनेचे स्वरूपही बदलले आहे. राखी बांधतानाचे फोटो सोशल मीडियावर येतात, व्हिडिओ कॉलवरून शुभेच्छा दिल्या जातात, ऑनलाइन भेटवस्तू पाठवल्या जातात. अंतर कमी झाले आहे. तंत्रज्ञानाने संवाद सोपा केला आहे.

पण या सगळ्या चमकदार डिजिटल जगाच्या पलीकडे एक वेगळा प्रश्नही उभा राहतो—राखीच्या धाग्यापेक्षा संपत्तीचा हिशेब मोठा ठरतोय का?

पूर्वी भाऊ-बहिणीच्या नात्याकडे पाहताना प्रेम, जिव्हाळा, आपुलकी आणि एकमेकांसाठी उभे राहण्याची भावना महत्त्वाची मानली जात होती. बहिणीने भावाला राखी बांधली की त्या धाग्यामागे कोणताही आर्थिक हिशेब नसतो, अशी एक भावनिक कल्पना होती. भाऊही बहिणीला सणानिमित्त भेट देताना तिच्या सुखाची काळजी व्यक्त करत असे.

आज परिस्थिती बदलली आहे. मुलींना वडिलांच्या संपत्तीत कायदेशीर हक्क आहे. हा हक्क समानतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. मुलगी ही कुटुंबाचा भाग आहे आणि तिला तिच्या वडिलांच्या संपत्तीत हक्क मिळणे ही सामाजिक बदलाचीच खूण आहे. परंतु जिथे संपत्तीचा प्रश्न निर्माण होतो, तिथे काही कुटुंबांमध्ये भावंडांच्या नात्यांमध्ये तणावही दिसू लागतो.

वडिलांची संपत्ती वाटण्याची वेळ येते तेव्हा काही ठिकाणी प्रश्न असा राहत नाही की "बहिणीला काय द्यायचे?" तर प्रश्न होतो, "तिचा किती हिस्सा आहे?" भावाच्या मनात बहिणीच्या हक्कापेक्षा स्वतःच्या वाट्याचा विचार मोठा होऊ शकतो. बहिणीच्या मनातही



"माझा हक्क मला मिळालाच पाहिजे" ही भावना अधिक ठाम होते. कायदेशीर हक्क आणि कौटुंबिक जिव्हाळा यांच्यात संघर्ष निर्माण होतो तेव्हा नात्याची खरी परीक्षा सुरू होते.

इथे एक गोष्ट स्पष्टपणे समजून घ्यावी लागेल. बहिणीने वडिलांच्या संपत्तीत आपला हक्क मागणे म्हणजे तिचे भावावरचे प्रेम कमी झाले असे नाही. त्याचप्रमाणे बहिणीला हक्क मिळाल्यामुळे भावाने तिच्यावरचे प्रेम कमी करणेही योग्य नाही. समस्या हक्कात नसते; समस्या अनेकदा त्या हक्काकडे पाहण्याच्या मानसिकतेत असते.

आपल्या समाजात मुलगी लग्न झाल्यानंतर "ती दुसऱ्या घरची झाली" अशी मानसिकता अनेक वर्षे होती. त्यामुळे माहेरच्या संपत्तीत तिचा हक्क आहे, ही कल्पना अनेकांना सहज स्वीकारता आली नाही. भावाला वाटत असे की वडिलांची संपत्ती मुलाकडेच राहावी. बहिणीने हिस्सा मागितला की काही वेळा तिला स्वार्थी ठरवले जाते. पण हक्क मागणे आणि नाते तोडणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

दुसरीकडे काही वेळा संपत्तीच्या वाटणीचा प्रश्न इतका मोठा होतो की भावंडांमधील वर्षानुवर्षांचा जिव्हाळा एका कागदाच्या तुकड्यावर येऊन थांबतो. बालपणी एकत्र वाढलेली भावंडे, एकमेकांच्या सुख-दुःखात उभी राहिलेली माणसे, आई-वडिलांच्या आठवणी जपणारी भावंडे—संपत्तीच्या प्रश्नावर एकमेकांपासून दूर जातात. फोन बंद होतात, भेटी कमी होतात आणि रक्षाबंधनाच्या दिवशीही औपचारिक शुभेच्छांपलीकडे नाते उरत नाही.

डिजिटल युगाची ही एक विचित्र बाजू आहे. आपण जगाच्या दुसऱ्या टोकावर असलेल्या व्यक्तीशी काही सेकंदांत संपर्क साधू शकतो; पण आपल्या घरातील व्यक्तीशी मनापासून संवाद साधण्यासाठी वेळ काढत नाही. सोशल मीडियावर भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे फोटो टाकले जातात, पण प्रत्यक्ष आयुष्यात संपत्तीच्या वाटणीवर कटुता निर्माण होते. एका पोस्टमध्ये "माझी लाडकी बहीण" लिहिणे सोपे आहे; तिच्या हक्काचा आदर करणे मात्र नात्याची खरी कसोटी आहे.

रक्षाबंधनाचा अर्थ फक्त भावाने बहिणीचे रक्षण करणे एवढाच मर्यादित राहू नये. आजच्या काळात बहिणीच्या हक्काचा, सन्मानाचा आणि स्वाभिमानाचा आदर करणे हाही त्या नात्याचा भाग आहे. त्याचप्रमाणे बहिणीनेही भावाकडे केवळ संपत्तीच्या हिशेबाने पाहू नये. हक्क आणि नाते हे एकमेकांचे शत्रू बनण्याची गरज नाही.

खरे तर वडिलांची संपत्ती किती आहे, कोणाला किती मिळणार, कोणाचा हिस्सा किती—या प्रश्नांपेक्षा आई-वडिलांनी आपल्या मुलांना दिलेले संस्कार, प्रेम आणि आठवणी अधिक मौल्यवान असतात. संपत्ती वाटून घेता येते; पण एकदा नाते तुटले की ते पूर्वीसारखे जोडणे कठीण असते.

म्हणूनच रक्षाबंधनाच्या दिवशी आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा—आपल्या नात्यांची किंमत आपण पैशात मोजत आहोत का?

बहिणीला तिचा कायदेशीर हक्क मिळाला म्हणून भावाचे प्रेम कमी होण्याची गरज नाही. भावाने प्रेमाने दिले म्हणून बहिणीने आपला हक्क सोडण्याचीही गरज नाही. दोघांनीही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे—संपत्तीची वाटणी होऊ शकते, पण नात्याची वाटणी होऊ नये.

राखीचा धागा मनगटावर बांधला जातो; पण त्याचा खरा अर्थ मनात जपला जातो. डिजिटल युग कितीही पुढे गेले, संपत्तीचे व्यवहार कितीही आधुनिक झाले, कायदे कितीही बदलले तरी भाऊ-बहिणीच्या नात्याची खरी श्रीमंती प्रेम, विश्वास आणि परस्पर सन्मानातच आहे.

म्हणून यंदाच्या रक्षाबंधनाला राखी बांधताना फक्त फोटो काढू नका; नात्याचा धागाही घट्ट करा. संपत्तीचा हिशेब कागदावर असू द्या, पण भाऊ-बहिणीच्या नात्याचा हिशेब मनात ठेवू नका.

**▪ - डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.**

## रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वावर जपला आपुलकीचा स्नेहबंध

### गोरगरीब, वंचित व भटक्या-विमुक्त भगिनींसोबत आ. सुरेश धस यांनी साजरा केला रक्षाबंधनाचा सण

**▪ आष्टी प्रतिनिधी**

रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त आष्टी विधानसभेचे भाजप आमदार सुरेश धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानी यंदाही रक्षाबंधनाचा सण आपुलकी, प्रेम आणि स्नेहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

सालाबादप्रमाणे यंदाही गोरगरीब, वंचित तसेच भटक्या-विमुक्त समाजातील असंख्य भगिनींनी आमदार सुरेश धस यांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा केला. भगिनींनी व्यक्त केलेल्या प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा सन्मान म्हणून प्रत्येक भगिनीला साडी-चोळी व फळे देऊन आदरपूर्वक सन्मान करण्यात आला.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने केवळ राखीचा धागा बांधला गेला नाही, तर समाजातील वंचित घटकांशी असलेला आपुलकीचा आणि माणुसकीचा स्नेहबंध अधिक दृढ करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

भगिनींच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान, आनंद आणि प्रेम हेच या रक्षाबंधन सोहळ्याचे खरे वैशिष्ट्य ठरले. राखीच्या या पवित्र धाग्याने जपलेला स्नेहबंध सदैव दृढ राहावा आणि प्रत्येक भगिनीच्या आयुष्यात सुख, समाधान, आनंद व समृद्धी नांदावी, अशी मनःपूर्वक सदिच्छा आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली.

"रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून प्रेम, विश्वास, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारा सण आहे. माझ्या सर्व भगिनींचे प्रेम आणि आशीर्वाद हीच माझी खरी ताकद आहे," अशी भावना आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली. यावेळी अद्वैतचंद्र निवासस्थानी रक्षाबंधनासाठी आलेल्या भगिनींमध्ये आनंदाचे आणि भावनिक वातावरण पाहायला मिळाले. सर्व भगिनींना आमदार सुरेश धस यांच्याकडून रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!





# वेलावन सेंथिलकुमारची फायनलमध्ये धडक; बुडापेस्ट स्क्वॉश ओपनमध्ये हंगेरीच्या स्टारशी रंगणार लढत

बुडापेस्ट : भारताचा स्टार स्क्वॉशपटू वेलावन सेंथिलकुमारने PSA बुडापेस्ट स्क्वॉश ओपनच्या अंतिम फेरीत प्रवेश करत शानदार कामगिरी केली आहे. शुक्रवारी झालेल्या रोमांचक उपांत्य सामन्यात सेंथिलकुमारने स्वदेशी वीर चोत्रानीचा ३-२ असा पराभव करत अंतिम फेरी गाठली. दोन्ही भारतीय खेळाडूंमध्ये झालेला हा सामना अत्यंत चुरशीचा ठरला. सेंथिलकुमारने ९-११, ११-८, ११-७, १-११, १२-१० अशा गुणांनी विजय मिळवला. विशेष म्हणजे, निर्णायक पाचव्या गेममध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये चांगलीच झुंज पाहायला मिळाली. अखेर सेंथिलकुमारने संयम राखत १२-१० असा गेम जिंकला आणि अंतिम फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं. या स्पर्धेत सेंथिलकुमारची कामगिरी सुरुवातीपासूनच प्रभावी राहिली आहे. उपांत्यपूर्व फेरीत त्याने मलेशियाच्या ईन यो एनजीचा ३-० असा पराभव करत मोठा धक्का दिला होता. त्यानंतर चोत्रानीविरुद्धच्या लढतीतही त्याने दमदार पुनरागमन करत विजय मिळवला. दरम्यान, अंतिम फेरीत सेंथिलकुमारसमोर आता हंगेरीचा स्थानिक खेळाडू बालाझ फारकास याचं आव्हान असणार आहे. फारकासने उपांत्य फेरीत इजिप्तच्या मुस्तफा एलसिर्तीचा ३-० असा सरळ गेममध्ये पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे सेंथिलकुमार आणि फारकास यांच्यात यापूर्वी दोन सामने झाले असून दोघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे. त्यामुळे अंतिम सामन्यात दोघांमध्ये पुन्हा एकदा रंगतदार लढत पाहायला मिळणार आहे. आता भारतीय चाहत्यांच्या नजरा सेंथिलकुमारकडे लागल्या असून, बुडापेस्टमध्ये तो विजेतेपदाची ट्रॉफी उंचावतो का, याची उत्सुकता आहे.

# नीरज चोप्राने डायमंड लीगच्या अंतिम फेरीत मिळवले स्थान

■ नवी दिल्ली वृत्तसंस्था



भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने 2026 डायमंड लीगच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. हंगामाची अंतिम फेरी 4 आणि 5 सप्टेंबर रोजी ब्रुसेल्स येथे आयोजित करण्यात येणार आहे. दोन वेळचा ऑलिम्पिक पदकविजेता नीरजने या हंगामात डायमंड लीगच्या दोन टप्प्यांमध्ये सहभाग घेतला. त्याने 19 जून रोजी दोहा टप्प्यात 85.69 मीटरच्या प्रयत्नासह चौथे स्थान मिळवले होते. त्यानंतर 21 ऑगस्ट रोजी लॉझान टप्प्यात 88.05 मीटरची हंगामातील सर्वोत्तम कामगिरी करत दुसरे स्थान मिळवले. नीरज 27 ऑगस्ट रोजी ज्युरिख टप्प्यात सहभागी झाला नाही, जिथे पुरुषांची भालाफेक स्पर्धाही कार्यक्रमात समाविष्ट होती. मात्र, लॉझानमधील त्याच्या कामगिरीने अंतिम फेरीत स्थान पक्के करण्यासाठी पुरेसे गुण मिळवून दिले. नीरजने या हंगामात ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेतही 85.83 मीटरच्या थ्रोसह रौप्यपदक जिंकले होते.

ब्रुसेल्समध्ये होणाऱ्या अंतिम फेरीपूर्वी श्रीलंकेचा रुमेश थारंगा पाथिरागे भालाफेकीच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. त्याने ज्युरिख टप्प्यात 92.07 मीटरच्या शानदार प्रयत्नासह विजय मिळवला. अँडरसन पीटर्स, केशोर्न वॉलकॉट आणि कर्टिस थॉम्पसन हे देखील विजेतेपदाचे प्रमुख दावेदार आहेत. नीरजचे लक्ष त्याच्या दुसऱ्या डायमंड ट्रॉफी विजेतेपदावर असेल. त्याने 2022 मध्ये डायमंड लीगचे विजेतेपद जिंकले होते आणि त्यानंतर तीन वेळा उपविजेता राहिला आहे.

डायमंड लीगमध्ये असे मिळतात गुण

डायमंड लीगमध्ये मे ते सप्टेंबर दरम्यान 14 टप्पे असतात. प्रत्येक स्पर्धेत पहिल्या आठ खेळाडूंना अनुक्रमे 8, 7, 6, 5, 4, 3, 2 आणि 1 गुण मिळतात. नीरजने दोहा येथे चौथ्या स्थानासाठी सात आणि लॉझानमध्ये दुसऱ्या स्थानासाठी पाच गुण मिळवले, ज्यामुळे त्याचे एकूण 12 गुण झाले. केनियाचा ज्युलियस येगो ज्युरिख टप्प्यापूर्वी नऊ गुणांवर होता. ज्युरिखमध्ये 81.66 मीटरच्या प्रयत्नासह पाचव्या स्थानावर राहिल्यानंतर त्याचे 13 गुण झाले आणि त्यानेही अंतिम फेरीसाठी क्वालीफाय केले.

# जर्मनीवर ३-१ असा दणदणीत विजय; भारतीय महिला हॉकी संघाची विश्वचषकात ऐतिहासिक कामगिरी

■ ॲमस्टेलवीन : वृत्तसंस्था



भारतीय महिला हॉकी संघाने FIH महिला हॉकी विश्वचषक २०२६मध्ये शानदार कामगिरी करत पाचव्या स्थानावर स्पर्धेचा शेवट केला. पाचव्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात भारताने जागतिक क्रमवारीतील बलाढ्य जर्मनीचा ३-१ असा पराभव करत ऐतिहासिक विजय नोंदवला. १९७४च्या पहिल्या विश्वचषकात चौथं स्थान मिळवल्यानंतर भारताची ही विश्वचषकातील सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. नेदरलँड्समधील ॲमस्टेलवीनच्या वागेनर स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात सुरुवातीला दोन्ही संघांकडून सावध खेळ पाहायला मिळाला. पहिल्या दोन क्वार्टरमध्ये एकही गोल झाला नाही. मात्र, सामन्याच्या तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाने आक्रमक खेळ करत सामन्याचं चित्रच बदलून टाकलं.

भारतासाठी इशिकाने ४३व्या मिनिटाला गोल करत संघाचं खातं उघडलं. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत भारताने जर्मनीवर आणखी दोन गोल केले. नवनीत कौरने ४४व्या आणि ४७व्या मिनिटाला सलग दोन गोल करत भारताची आघाडी ३-० अशी मजबूत केली. तीन गोलच्या पिछाडीनंतर जर्मनीने जोरदार पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. अखेर लिन क्रिंग्जने ५९व्या मिनिटाला जर्मनीसाठी एक गोल केला. मात्र भारतीय बचावफळीने शेवटच्या क्षणी कोणतीही मोठी चूक होऊ दिली नाही आणि सामना ३-१ असा जिंकला.

या संपूर्ण विश्वचषक मोहिमेत भारताने सातत्यपूर्ण कामगिरी केली. संघाने केवळ एक सामना गमावला, तर चीन, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामने बरोबरीत राखले. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारताने ६-१ असा मोठा विजय मिळवला, तर यजमान आणि ऑलिम्पिक विजेत्या नेदरलँड्सकडून भारताला ०-२ असा पराभव स्वीकारावा लागला. विशेष म्हणजे, भारतीय संघात ११ विश्वचषक पदार्पण करणाऱ्या खेळाडूंचा समावेश होता. त्यामुळे या युवा आणि अनुभवी खेळाडूंच्या मिश्रणाने मिळवलेलं पाचवं स्थान विशेष महत्त्वाचं ठरतं. आता भारतीय संघाचं लक्ष पुढील महिन्यात होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेकडे असेल. विश्वचषकातील या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारतीय महिला हॉकी संघाचा आत्मविश्वास नक्कीच वाढला आहे. भारताने पुन्हा एकदा जागतिक हॉकीच्या मंचावर आपली ताकद दाखवून दिली आहे.

# प्रज्ञानानंदने रचला इतिहास, ग्रँड चेस टूर फायनल जिंकणारा पहिला भारतीय ठरला

■ सेंट लुईस : वृत्तसंस्था



भारतीय बुद्धिबळपटू आणि ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंदाने फॅबियानो करूआनाचा पराभव करत इतिहास रचला आहे. सेंट लुईसमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात प्रज्ञानानंदाने १५-१३ असा विजय मिळवत विजेतेपद पटकावलं. या विजयासह तो जिंकणारा पहिला भारतीय ठरला आहे. अंतिम सामन्याच्या शेवटच्या दिवशी प्रज्ञानानंदासमोर मोठं आव्हान होतं. तो तब्बल सहा गुणांनी पिछाडीवर होता. पहिल्या क्लासिकल गेममध्ये करूआनाने ६-० अशी आघाडी घेतली, तर दुसरा क्लासिकल सामना ३-३ असा बरोबरीत राहिला.

मात्र, प्रज्ञानानंदाने हार न मानता जबरदस्त पुनरागमन केलं. त्याने दोन्ही रॅपिड गेम जिंकत सामन्यात जोरदार कमबॅक केलं. त्यानंतर ब्लिट्झ गेम्समध्येही त्याने आवश्यक नियंत्रण राखलं आणि अखेर एकूण १५-१३ असा विजय मिळवत ट्रॉफीवर नाव कोरलं. या ऐतिहासिक विजेतेपदासाठी प्रज्ञानानंदाला तब्बल २ लाख अमेरिकन डॉलरचं बक्षीस मिळालं आहे. भारतीय बुद्धिबळासाठीही हा मोठा क्षण मानला जात आहे.

विजयानंतर प्रज्ञानानंदाने या स्पर्धेचं महत्त्व अधोरेखित केलं. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेनंतर ही जगातील सर्वात प्रतिष्ठित स्पर्धांपैकी एक असल्याचं त्याने म्हटलं. या स्पर्धेचं विजेतेपद मिळवणं आपल्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचंही त्याने सांगितलं. विशेष म्हणजे, प्रज्ञानानंदाने प्रतिकूल परिस्थितीतून केलेलं हे पुनरागमन त्याच्या मानसिक ताकदीचं आणि दबावाखाली खेळण्याच्या क्षमतेचं उत्तम उदाहरण ठरलं आहे. भारतीय बुद्धिबळाच्या इतिहासात प्रज्ञानानंदाच्या या विजयाची नोंद आता एका ऐतिहासिक अध्यायाप्रमाणे झाली आहे.

# दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार डीन एल्गरने घेतली व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्ती



■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार आणि अनुभवी कसोटी सलामीवीर डीन एल्गरने (Dean Elgar Retirement) व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. सध्याचा काउंटी चॅम्पियनशिप हंगाम संपल्यानंतर एल्गर क्रिकेटच्या सर्व प्रकारांना अलविदा करणार आहे. जवळपास दीड दशकाच्या कारकिर्दीत त्याने दक्षिण आफ्रिकेच्या कसोटी संघात महत्त्वाची भूमिका बजावत जगातील विश्वासार्ह कसोटी सलामीवीरांमध्ये आपले स्थान निर्माण केले.

### दक्षिण आफ्रिकेसाठी अशी राहिली कारकीर्द :

डीन एल्गरने दक्षिण आफ्रिकेकडून ८६ कसोटी सामने खेळताना ३५.९२च्या सरासरीने ५,३४७ धावा केल्या. त्याच्या नावावर १४ शतके आणि २३ अर्धशतके आहेत. त्याची सर्वोच्च धावसंख्या १९९ धावा असून, २०१७ मध्ये बांगलादेशविरुद्ध त्याने ही शानदार खेळी केली होती. एल्गरची फलंदाजी आक्रमक फटक्यांपेक्षा संयम, तंत्र आणि कठीण परिस्थितीत मोठी खेळी करण्यासाठी ओळखली जात होती. त्याने दक्षिण आफ्रिकेकडून आठ एकदिवसीय सामनेही खेळले असून, त्यात १७.३३च्या सरासरीने १०४ धावा केल्या.

### २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा :

डीन एल्गरने २०१२ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तब्बल १२ वर्षे दक्षिण आफ्रिकेच्या कसोटी संघाचा महत्त्वाचा भाग राहिल्यानंतर त्याने २०२४च्या सुरुवातीला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. भारताविरुद्ध केपटाऊन येथे झालेली कसोटी त्याची अखेरची आंतरराष्ट्रीय कसोटी ठरली. दुखापतीमुळे टेंबा बावुमाला मैदानाबाहेर जावे लागल्यानंतर एल्गरने या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचे नेतृत्वही केले. आपल्या शेवटच्या कसोटीत त्याने १८५ धावांची शानदार खेळी करत संघाला मजबूत स्थितीत पोहोचवले. दक्षिण आफ्रिकेने हा सामना एक डाव राखून जिंकत मालिका १-१ अशी बरोबरीत सोडवली.

### काउंटी क्रिकेटमध्ये दुसरी इनिंग :

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर एल्गरने इंग्लंडमधील काउंटी क्रिकेटमध्ये आपली दुसरी इनिंग सुरू केली. कसोटी क्रिकेटचे मर्यादित वेळापत्रक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याच्या कमी होत चाललेल्या संधी लक्षात घेऊन तो Essex संघात दाखल झाला. एसेक्समध्ये त्याने इंग्लंडचा दिग्गज फलंदाज ॲलिस्टर कुकच्या निवृत्तीनंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याची महत्त्वाची जबाबदारी स्वीकारली.

### Essex कडूनही दमदार कामगिरी :

एल्गरने २०२४ मध्ये एसेक्सकडून काउंटी चॅम्पियनशिपमध्ये शानदार कामगिरी केली. त्याने हंगामात १,००० हून अधिक धावा करत क्लबचा 'Batter of the Year' पुरस्कार मिळवला. याशिवाय २०२४च्या टी२० ब्लास्टमध्येही त्याने ३००हून अधिक धावांचे योगदान दिले. यापूर्वी एल्गरने या संघांकडूनही काउंटी क्रिकेट खेळले आहे. दक्षिण आफ्रिकेतील तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील त्याचा प्रदीर्घ अनुभव एसेक्सच्या ड्रेसिंग रूमसाठीही महत्त्वाचा ठरला. कठीण परिस्थितीत संयमी फलंदाजी, नेतृत्व आणि संघासाठी योगदान देण्याची वृत्ती यामुळे डीन एल्गरने दक्षिण आफ्रिकेच्या कसोटी क्रिकेटमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली.

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

● बीड, शनिवार, 29 ऑगस्ट 2026



# ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाची दमदार टीम जाहीर

## कार्यकारिणीत समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व देण्याचा योग्य प्रयत्न



**■ बीड प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी जिल्हा युवा मोर्चाची कार्यकारिणी घोषित केली आहे. युवा मोर्चाच्या या नव्या दमदार टीममध्ये समाजातील सर्व जाती धर्माच्या युवकांना प्राधान्य देऊन एक चांगला संदेश देण्यात आला आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्यात भाजपची संघटनात्मक फळी मजबूत करण्याच्या दृष्टीने युवा मोर्चाच्या माध्यमातून युवकांना न्याय दिला आहे. नव्या कार्यकारिणीत समाजातील ओबीसी, मायक्रो ओबीसी, मराठा, मुस्लिम, मागासवर्गीय आदी विविध जाती धर्माला प्रतिनिधित्व देण्याचा योग्य प्रयत्न करण्यात आला आहे. यात ७ सरचिटणीस, ११ उपाध्यक्ष, १५ सचिव, १० सदस्य आणि एक कोषाध्यक्ष यांचा समावेश आहे.

### प्रत्येकांना न्याय देण्याचा प्रयत्न करू : ना. पंकजाताई

संघटनेत असंख्य कार्यकर्ते असताना प्रत्येकांना पदं देणं, यात सामावून घेणं माझ्यासाठी कठीण होतं, तरी देखील प्रत्येकांना संधी दिली आहे. भविष्यात वेगवेगळ्या माध्यमातून प्रत्येक कार्यकर्त्यांस न्याय देण्याचा माझा प्रयत्न असेल असे ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

### अशी आहे नवी कार्यकारिणी

युवा मोर्चाची जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे सरचिटणीस – चंद्रकांत देवकते (परळी), संग्राम बांगर (बीड), युवराज वायबसे, किशोर खोले (आष्टी), विष्णू आगे (माजलगाव), विकास पवार (गेवराई), उत्तरेश्वर निंगुळे (केज), उपाध्यक्ष – संतोष सोळंके (परळी), विलास काचगुडे (अंबाजोगाई), ॲड.नागेश तांबारे, पियुष सवई (बीड), विवेक पाखरे, संभाजी झांबरे (आष्टी), सुरज घुले (केज), रणजित रुपनर (धारुर), भिष्माचार्य दाभाडे (गेवराई), शहाजी सोळंके (माजलगाव), विनोद बांगर (पाटोदा), कोषाध्यक्ष – केशव बडे (बीड), सचिव – गोविंद मुंडे (परळी), मनोज कोरडे (माजलगाव), भुषण पवार, सुशिल जाधव, आनंद राऊत (बीड), माऊली पानसंबळ, सचिन वारे, आशिष जायभाये (शिरुर), मनोज गुंड, करण काळे (गेवराई), वैजनाथ देशमुख (केज), गणेश बडे (धारुर), महादेव लटपटे, शंभुराज महारनोर (आष्टी), सय्यद अन्सार (अंबाजोगाई), सदस्य – इश्वर भांगे, सुनिल चादर, श्यामसुदर पाटील (गेवराई), सुधीर सोनवणे (पाटोदा), अमोल वाघमारे, सुधाकर मुळे (बीड), तुकाराम हंडे (माजलगाव), रुपेश लगड, बाळासाहेब तिडके (धारुर), संतोष गडदे (अंबाजोगाई)

# आ. सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नांना यश.. करंजी (पांढरी) प्रकल्पातील पाणी बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे जामगाव तलावात सोडणार..



### पाण्याचा कार्यक्षम वापर होणार

**■ आष्टी तालुका हा पर्जन्यमानाच्या अनिश्चिततेमुळे वारंवार दुष्काळसदृश परिस्थितीला सामोरा जातो. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने व अधिकाधिक कार्यक्षम वापर करणे गरजेचे आहे. कालव्याचे बंदिस्त नलिका प्रणालीमध्ये रूपांतर झाल्यामुळे पाण्याची वाहतुकीदरम्यान होणारी संभाव्य गळती व बाष्पीभवनामुळे होणारी हानी कमी होण्यास मदत होणार आहे. बचत होणाऱ्या पाण्याचा उपयोग जामगाव पाझर तलावासाठी करण्याचा प्रस्ताव असल्याने या परिसरातील सिंचन व्यवस्थेलाही त्याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. शासनाच्या या निर्णयामुळे करंजी (पांढरी) प्रकल्पातील पाण्याचा अधिक शास्त्रशुद्ध आणि कार्यक्षम वापर होऊन जामगाव परिसरातील जलसाठा व सिंचन क्षमतेला चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुढील सर्वेक्षण व तांत्रिक प्रक्रियेनंतर प्रत्यक्ष कामाला गती मिळणार असल्याने शेतकऱ्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.**

**■ आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील सिंचन व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी भाजपा आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नांना आणखी एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. आष्टी तालुक्यातील करंजी (पांढरी) लघुपाटबंधारे तलावाच्या डाव्या कालव्याचे बंदिस्त नलिका प्रणालीमध्ये (PDN) रूपांतर करून होणाऱ्या पाणी बचतीतून जामगाव पाझर तलावामध्ये पाणी सोडण्याच्या प्रस्तावाला महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने तत्त्वतः मान्यता दिली आहे.. जलसंपदा विभागाने दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी शासनाच्या उपसचिवांच्या स्वाक्षरीने याबाबतचे पत्र जारी केले आहे. या निर्णयामुळे आष्टी तालुक्यातील सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या करंजी (पांढरी) प्रकल्पाच्या पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर होण्याबरोबरच जामगाव पाझर तलावाला पाणी उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

शासनाच्या पत्रानुसार, करंजी (पांढरी) लघुपाटबंधारे प्रकल्पाचा डावा कालवा बंद नलिका प्रणालीमध्ये रूपांतरित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे होणाऱ्या पाणी बचतीचा वापर करून डाव्या कालव्यामधून अतिरिक्त नवीन विमोचकाद्वारे जामगाव पाझर तलावामध्ये बंद नलिका प्रणालीच्या माध्यमातून पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यासाठी आवश्यक असलेले सर्वेक्षणाचे काम विस्तार व सुधारणांतर्गत प्रस्तावित करण्यास शासनाने तत्त्वतः मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या मराठवाडा विभागासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात सर्वेक्षणाच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या प्राथमिक सर्वेक्षणाच्या ठोक तरतुदीतून हे काम हाती घेण्यासही शासनाने मान्यता दिली आहे.



# श्रीगोंद्याहून आलेल्या शेख महंमद महाराजांच्या पायी दिंडीतील अश्व रिंगण सोहळ्याने वाहिरा नगरीत भक्तीचा उत्साह

**■ प्रतिनिधी सोपान पगारे**


संत शिरोमणी शेख महंमद महाराज यांच्या पावनभूमीत सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात एक आगळा-वेगळा भक्तिमय सोहळा पार पडला.

श्रीगोंदा येथील संत शिरोमणी शेख महंमद महाराजांची पायी दिंडी अनेक वर्षांपासून वाहिरा येथे येत असते. या दिंडी सोहळ्यातील शेख महंमद महाराजांच्या अश्वाचे सुंदर रिंगण वाहिरा येथे मोठ्या उत्साहात पार पडले. अश्व रिंगण पाहण्यासाठी वाहिरा आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात हा रिंगण सोहळा खूप आनंदात साजरा झाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही या दिंडीचे वाहिरा नगरीत मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.

### २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिवस

# हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद राष्ट्रीय खेळांचे शिल्पकार

२९ ऑगस्ट १९०५ मध्ये मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला व सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे तेजोमय लखलखता तारा या भारत भुमित जन्माला आला आणि दैवी शक्तीच्या रूपात हॉकीचा शहनशहा निर्माण झाला.मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून संपूर्ण भारतात साजरी केली जाते.हा दिवस संपूर्ण खेळाडूंसाठी सुवर्ण दिवस आहे. मेजर ध्यानचंद हे कर्तबगार,जिद्दी आणि चीकाटी वृत्तीचे महान खेळाडू होते. त्यांच्या खेळाकडे संपूर्ण जगाचे लक्ष रहात होते. कारण त्यांच्या खेळण्यात मोठी जादू होती.त्यामुळेच त्यांना हॉकीचे जादुगार म्हणतात.मेजर ध्यानचंद यांच्या कारकिर्दीत १९२८, १९३२, १९३६अशा प्रकारे तिनं वेळा गोल्डन कामगिरी बजावुन देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य केले.यातुन ते संपूर्ण जगात हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध झाले.आज आपल्याला देशात राष्ट्रीय खेळांचा जो बोलबाला आणि लौकिकता दिसत आहे. त्याचे संपूर्ण क्षेय मेजर ध्यानचंद यांना जाते आणि यातूनच देशातील खेळाडूंना मानसन्मान मीळत आहे. हॉकी सोबतच कबड्डी, भालाफेक, थाळी फेक, खो-खोसह अशा अनेक मातीतील राष्ट्रीय खेळांना मोठे स्थान मिळविले आहे.यामुळे खेळाडूंचे होसले बुलंद झाल्याचे दिसून येते. देशात खासदार क्रीडा महोत्स किंवा इतर माध्यमातून खेळांना महत्व देऊन खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण केली जाते.याच अनुषंगाने अनेक खेळांचे मोठ्या प्रमाणात आयोजन वेगवेगळ्या राज्यांमध्ये केले जाते. राष्ट्रीय खेळांना सकारात्मक भूमिका देण्याचे क्षेय मेजर ध्यानचंद यांच्या प्रयत्नातूनच साकार होत आहे. आपण पहातो की आज देशातील महत्वपूर्ण संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचले आहे. त्यामुळे



आपण पहातो की आज राष्ट्रीय खेळांचा बोलबाला आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. कबड्डी हा राष्ट्रीय खेळ होता आता आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहोचला आहे ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे.भारताने राष्ट्रीय खेळांमध्ये अव्वल स्थान मिळवून देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य देशाच्या खेळाडूंनी केले.त्यामुळे आपण समजू शकतो की राष्ट्रीय खेळ अत्यंत शक्तीशाली आणि महत्वपूर्ण आहेत. भारतीय खेळाडू देशात-विदेशात जावुण राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावुन सुवर्ण पदक, रौप्य पदक व कांस्य पदक प्राप्त करून तिरंग्याची शान उंचावतात. त्यामुळे देशातील तळागाळातील संपूर्ण खेळाडूंना माझा सलाम. कॉमनवेल्थ गेम, ऑलिंपिक खेळ, पॅराऑलिम्पिकमध्ये राष्ट्रीय खेळ मोठ्या प्रमाणात दिसून येते व राष्ट्रीय खेळांमुळेच आपण आज जगात आपली आगळावेगळी छाप सोडली आहे व पकड मजबूत केली आहे.याचाच आनंद देशातील १४५ कोटी जनता नेहमी घेत असते.आज खेळांच्या बाबतीत असो वा अन्य बाबतीत संपूर्ण जग भारतासमोर नतमस्तक होतांना दिसते. याचे मुख्य कारण म्हणजे मेजर ध्यानचंद यांच्या सारख्या खेळाडूंनी घालून दिलेली जडणघडण व आपल्या पुर्वजांनी जे मातीतील खेळ आपल्याला शिकवीले त्यातूनच आज संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचल्याचे दिसून येते. त्याकाळी जगातील नामांकित व्यक्ती मेजर ध्यानचंद यांची हॉकी खेळण्याची कला पहाण्यासाठी उत्सुक असायचे. कारण लोकांना वाटायचं की त्यांच्या हॉकी स्टिकमध्ये चुंबक आहे की काय असे वाटत होते.१९३५ साली विश्वविख्यात क्रीकेटपटु डॉन ब्रॅडमन मेजर ध्यानचंद यांना भेटले.त्यांनी त्यांच्या हॉकीतील चेंडू वळवीचे सामर्थ्य पाहून कौतुक केले म्हणाले ध्यानचंदजी खरोखरच आपल्या खेळण्यात व खेळात जादू आहे.१९३६ साली बर्लिन येथे जर्मनीचा हुकुमशाह एडॉल्फ हिटलर हा हॉकीचा अंतिम सामना पहात होता.जर्मनी विरूद्ध भारत असा सामना होत असतांना भारताने जर्मनीचा ८ विरूद्ध १ गोलनी दनदणीत पराभव केला.हा खेळ पाहुण हिटलर आश्चर्य चकित झाले.खेळ संपल्यानंतर हिटलरने मेजर ध्यानचंद यांना भेटीचे निमंत्रण दिले.या भेटीमध्ये हिटलरने मेजर ध्यानचंद यांचे खुप कौतुक केले व त्यांच्या खेळण्याची जादु पाहून जर्मनी सैन्यात मोठे पद देण्याची कबुल केले.परंतु मेजर ध्यानचंद यांचे राष्ट्रप्रेम सर्वोपरी होते.त्यामुळे मेजर ध्यानचंद यांनी हिटलरची ऑफर नाकारली व त्यांनी हिटलरला सांगितले की माझ्यासाठी माझी मातृभुमि महान.१९२८ ते १९६४ हे युग भारतीय हॉकीसाठी सुवर्ण युग मानल्या जाते.कारण या काळात आठ ऑलिंपिकमध्ये सात सुवर्ण पदक मिळाले होते हा भारतासाठी गौरवशाली इतिहास आहे.काही दिवसांपूर्वी महिला कुस्तीपटूंवर मोठा अन्याय झाला होता व न्याय मिळावा यासाठी खेळाडूंना रस्त्यावर यावे लागले ही चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.त्यामुळे खेळाडुंच्या बाबतीत मी सरकारला विनंती करतो की देशातील कोणत्याही खेळाडूंवर अन्याय होत असेल तर त्याच्या विरोधात ताबडतोब कारवाई व्हायला हवी. कारण प्रत्येक खेळाडू देशाची आन-बान-शान आहे.त्याचा मान-सन्मान सर्वच स्तरातून व्हायला हवा यात कोणत्याही प्रकारचे राजकारण नकोच.तेव्हाच खेळाडूंची मान उंचावेल. देशातील संपूर्ण तळागाळातील खेळाडूंना विनंती करतो की देशातील वाढते बदलते हवामान, वाढते तापमान, वाढते प्रदूषण व दिवसेंदिवस कमी होत असलेली ऑक्सिजनची मात्रा पहाता आज वृक्ष लागवड करणे अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवसाचे औचित्य साधून संपूर्ण खेळाडूंनी,सरकारनी,शाळा-महाविद्यालय व स्थानिक प्रशासनाने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे असे मला वाटते.कारण आज लावलेले वृक्ष अनंत काळापर्यंत जिवित राहिल व २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवस सर्वांच्याच स्मरणात राहील. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. जय हिंद!



**■ लेखक रमेश कृष्णराव लांजेवार. ( स्वतंत्र पत्रकार )**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)